

कोल्हापूर : प्रा. डॉ. जी. डी. यादव यांच्या हस्ते निवडीचे पत्र डॉ. तरवाळ यांना प्रदान करताना.

# डॉ. एन. एल. तरवाळ यांची निवड

**टेंबलाईवाडी :** पदार्थविज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ येथील सहायक प्रा. डॉ. एन. एल. तरवाळ यांची महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सेसतर्फे यंग असोसिएट फेलो म्हणून निवड झाली. निवडीचे प्रमाणपत्र अॅकॅडमीचे अध्यक्ष प्रा. डॉ. जी. डी. यादव यांच्या हस्ते प्रदान केले. सी. मेट, पुणेचे संचालक डॉ. बी. बी काळे, प्रा. डॉ. पी. पी. वडगावकर, प्रा. डॉ. पी. एस. पाटील आदी यावेळी उपस्थित होते. डॉ. तरवाळ हे संशोधनात अग्रेसर असून त्यांचे आतापर्यंत ६५ आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या शोधनिबंधांना १४३८ इतकी सायटेशन्स् मिळाली आहेत. त्यांनी २०११ मध्ये डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाने शिवाजी विद्यापीठाची पदार्थ विज्ञान विषयामध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांना डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. सी. एच. भोसले, डॉ. के. वाय. राजपूरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. पी. एन. भोसले, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांचे सहकार्य लाभले.

# स्वच्छता कार्यात राष्ट्रीय सेवा योजनेची प्रेरणा

## डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी / अक्षरदालन आणि निर्धार यांच्या वतीने 'अक्षरगप्पा' उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

माझ्या आतापर्यंतच्या स्वच्छताविषयक कामामागे शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेची प्रेरणा राहिली आहे. या योजनेच्या माध्यमातून माझ्यावर जे संस्कार झाले त्यामुळेच मी हे करू शकलो, असे सांगत महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी रविवारी संध्याकाळी आपला जीवनप्रवास उलगडला.

'अक्षरदालन' आणि 'निर्धार' यांच्या वतीने आयोजित १०५ व्या 'अक्षरगप्पा' कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित प्रकट मुलाखतीमध्ये त्यांनी आपला जीवनपटच अगदी मनमोकळेपणाने उलगडला. समीर देशपांडे यांनी ही मुलाखत रंगवली.



कलशेट्टी म्हणाले, मी महाविद्यालयात असताना शिवाजी विद्यापीठाचा सिनेट सदस्य झालो. राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकर्ता ते प्राध्यापक अशा जबाबदाऱ्या पार पाडल्या. तिथे समाजाची सेवा करण्याचे आणि तीही प्रामाणिकपणे याचे बाळकडू मिळाले. त्यामुळेच मी माझी वेगळी ओळख निर्माण करू शकलो. आपला हेतू स्वच्छ असला की मग कुणाची भीती बाळगण्याची गरज नाही.

सोलापूर जिल्ह्यातील वळसंग हे माझे खेडेगाव आहे. कलशेट्टी पाचवीत असताना वडील वारलेले. घरात सहा बहिणी. परिस्थिती गरिबीची. अशाही परिस्थितीमध्ये एम.एस्सी. बी.एड, नंतर प्राध्यापक म्हणून नोकरी केली. हे करत असताना वकिलीचाही अभ्यास केला. माजी मंत्री सिद्धराम म्हेत्रे यांच्याविरोधातील महाविद्यालयीन निवडणूक आणि विजय याची उजळणी कलशेट्टी यांनी केली. वरिष्ठ महाविद्यालयातील नोकरी सोडून महाराष्ट्र विकास सेवेतील प्रवेश, शरद पवार, मनोहर जोशी, देवेंद्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांसह आण्णासाहेब डांगे, आर. आर. पाटील, जयंत पाटील, शिवाजीराव नाईक या सर्वांबरोबरचे कामाचे अनुभवही त्यांनी यावेळी विशद केले.

निर्मल ग्राममध्ये महाराष्ट्राने घेतलेली भरारी, त्यासाठी महाराष्ट्रभर केलेल जागरण, पंचायत राजमध्ये देशात १३ व्या क्रमांकावर असताना तीन वर्षांत अथक परिश्रम करत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आणणे, महिलांना आरक्षण देण्याच्या मसुद्याचे लेखन, ग्रामस्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलित ग्रामविकास योजना, पेसा कायदा निर्मितीमधील सहभाग सांगत कलशेट्टी यांनी महाराष्ट्रातील स्वच्छता मोहिमांचा धावता आढावाच घेतला. रवींद्र जोशी यांनी स्वागत केले. रवींद्र उबेराय, जी. पी. माळी, मानसी दिवेकर, उदय कुलकर्णी, व्ही. एन. शिंदे, अरविंद राणे, राम देशपांडे, सुशील हंजे, राजश्री साकळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

### जयंती वाहती करण्याचे आव्हान

कलशेट्टी म्हणाले, नंदुरबारच्या जिल्हाधिकारी पदावरून माझी कोल्हापूरला बदली झाली. अनेकांच्या भुवया उंचावल्या. अनेकांनी कोल्हापूरच्या प्रश्नांची यादीच तयार केली; मात्र मी ज्या क्षेत्रामध्ये काम करत आलो आहे तेच प्राधान्याने करायचे ठरवले. जयंती ही मूळ नदी होती, तो नाला झाला होता. ही नदी वाहती करण्याचे आव्हान मी स्वीकारले. कोल्हापूरकरांनी मनापासून साथ दिली. हजारो टन कचरा काढला गेला. त्यासाठी प्रत्येक रविवारी परिश्रम घेतले. त्यास अनेकांनी सहकार्य केले. आता प्लास्टिकमुक्तीकडे आपली वाटचाल सुरू आहे.

# राजारामबापू पाटील यांच्या सहकार क्षेत्रातील योगदानावर शनिवारी चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या वतीने शनिवारी (दि.७) सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या निलांबरी सभागृहात 'राजारामबापू पाटील व महाराष्ट्रातील सहकार चळवळ' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन अमेरिकास्थित जेम्स मॅडिसन युनिव्हर्सिटीतील महात्मा गांधी सेंटर फॉर ग्लोबल नॉन-व्हॉयलेंसचे संचालक डॉ. टेरी बेटझील यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. चर्चासत्रास उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

# जगातील बदलांचा वेध घेत स्वत:ला घडवा

## डॉ. आनंद पाटील; केएमसी कॉलेजमध्ये पदवी प्रमाणपत्र समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदव्यांच्या पलीकडे एक खूप मोठ जग आहे. जगात वावरत असताना जे जे वाचले आहे, त्याचा संदर्भ जोडा व जगातील बदलांचा वेध घेत स्वतः ला घडवा. तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतातील आदर्श नागरिक बनाल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद पाटील यांनी केले.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजमध्ये आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षीय समारोपात आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान असल्याचे सांगितले. लोकांमध्ये मिसळून लोकांसाठी काम करणे हे शिवाजी विद्यापीठाचे संस्कार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेचे हे महाविद्यालय आदर्श बनविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.




**कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेजमध्ये आयोजित पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद पाटील. सोबत आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र-प्राचार्य डॉ. प्रशांत नागावकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

कार्यक्रमाची सुरुवात पसायदान व रोपाला पाणी घालून करण्यात आली. प्रा. मीना काळे यांनी पसायदान गायले. प्र-प्राचार्य डॉ. प्रशांत नागावकर यांनी प्रास्ताविक केले. पी. डी. तोरस्कर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन डॉ. संजय कांबळे यांनी केले. डॉ. बी.एम.पाटील यांनी आभार मानले. याप्रसंगी परीक्षा विभागप्रमुख प्रा. व्ही. के. तिवाटणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र कोळेकर आदी उपस्थित होते.

### दै. 'पुढारी'चे उपक्रम विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर : डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी

दै. 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. व्यक्तिमत्त्व विकास आणि स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना आपले स्थान भक्कम करण्यासाठी या उपक्रमाचा फायदा होत आहे. महापालिकेच्या शाळांमध्येही नावीण्यपूर्ण उपक्रम राबवून समाज घटकाशी असणारी नाळ दै. 'पुढारी'ने घट्ट केल्याचे गौरवोद्गार आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी यावेळी काढले.

# बदलत्या जीवनशैलीत पदवीला कौशल्याची जोड हवी

## प्राचार्य डॉ. अशोक भोईटे

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**

बदलत्या जीवनशैलीत व्यावहारिक जगण्याशी उच्च शिक्षणाचा काहीच संबंध नाही. पदवीच्या जोडीला एखादे कौशल्य असेल तरच आज विद्यार्थ्यांना जगाच्या बाजारात किंमत मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांनी केले.

व्यंकटेश महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष हरिश बोहरा, तर विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य भोईटे म्हणाले, स्वातंत्र्यानंतर एकीकडे आकाशाला गवसणी घालणाऱ्या




**इचलकरंजी : पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देताना प्राचार्य डॉ. अशोक भोईटे, संजय जाधव, हरिश बोहरा, प्राचार्य डॉ. विजय माने आदी.**

इमारती, तर दुसरीकडे वाढती झोपडपट्टी यातील विरोधाभास पदवीधरांनी मोडून काढायला हवा. अवघड आहे ते सोपे आणि सोपे आहे ते सहज व सुंदर करता आले पाहिजे. हरिश बोहरा यांनी जागतिकीकरणाच्या युगात विद्यार्थ्यांनी उद्योग, व्यवसायात उतरावे व देशाच्या उन्नतीसाठी सतत प्रयत्नशील राहावे, असे आवाहन केले. बाबासाहेब वडिंगे, संजय जाधव यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविकातून प्राचार्य डॉ. विजय माने यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देत महाविद्यालयाच्या गुणवत्तेचा चढता आलेख स्पष्ट केला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठ पदवी परीक्षेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण केले. व्यंकटेश महाविद्यालयातील बी. कॉम, बीबीए, एम.कॉम अशा विद्या शाखेतील ४९२ जणांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयात तसेच विद्यापीठ गुणवत्ता यादीत रँक मिळविणाऱ्यांसह ९ विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. परीक्षा संचालक डॉ.एन. एम. मुजावर यांनी आभार मानले. यावेळी अॅड. सत्यनारायण ओझा, महेश बांदवलकर, प्रा. डॉ. पंडित यासह प्राध्यापक, पदवीप्राप्त विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुवत, आवड ओळखून यशाच्या शिखरावर पोहचा

## डॉ. पाटील; 'वारणा'च्या विविध महाविद्यालयांत पदवीदान समारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. ३ : वारणानगर सहकारातील पंढरी आहे. तात्यासाहेब कोरे यांनी गरजू, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी उच्च शिक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावले आहे. जीवनात दृढनिश्चय, कठोर परिश्रम, स्वतःची कुवत आणि आवड ओळखून यशाच्या शिखरावर पोहचा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

येथील वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित विविध शिक्षण संस्थांच्या दुसऱ्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, विशेष कक्षाचे उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव उपस्थित होते.

प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी विविध महाविद्यालयांतील उपक्रमांचा आढावा घेतला. वारणा विभाग शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आमदार विनय कोरे यांनी शुभेच्छा दिल्या.

वारणा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर, तात्यासाहेब कोरे औषधनिर्माण-शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जॉन डिसोजा आणि तात्यासाहेब कोरे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे शिल्पाकृती पुतळ्यापासून ग्रंथदिंडी सुरू झाली. मोहरे येथील आदिनाथ नलवडे आणि सहकारी यांच्या वारकरी मंडळींनी सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन डॉ. मार्क मोनिस, डॉ. प्रीती शिंदे -पाटील यांनी केले. आभार प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर यांनी मानले. समारंभात ६०० हून अधिक स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. वारणा बाल वाद्यवृंदच्या विद्यार्थिनींनी पसायदान गायिले.




**वारणानगर : वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित विविध शिक्षण संस्थांच्या पदवी प्रदान वितरण सोहळ्यात स्नातकांना प्रमाणपत्र वितरण करताना ज्येष्ठ संशोधक प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. वासंती रासम. शेजारी प्रा. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एस. पांडव, प्राचार्य डॉ. टी. जी. पाटील, प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर, प्राचार्य डॉ. जॉन डिसोझा आदी.**